**मे. उच्च्यन्यायालय, दिवाणी अपीली अधिकारिता, मुंबई, यांचे न्यायालयात**

**जनहित याचिका क्रमांक १७६/ २०१२**

१ श्री राजेश मधुकर पंडित
२ श्री नागसेन( निशिकांत) मुरलीधर पगारे
३ श्री जगबीर निर्मल सिंग ........याचिकाकर्ते

वि.

१ नाशिक महानगरपालिका
२ आयुक्त, नाशिक महानगरपालिका
३ महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळ
४ भारत सरकार
५ महाराष्ट्र राज्य
६ महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
७ मे. इंडियाबुल्स रिअलटेक लि.
८ महाराष्ट्र राज्य उर्जा निर्मिती कं. लि. .........जाब देणार

श्री प्रवर्तक पाठक, याचिकाकर्त्या साठी.
श्री एम. एल. पाटील, जाब देणार १ व २ साठी.
श्री आर. बी. रघुवंशी ... ऋतुजा आंबेकर यांच्या सूचनेवरून, जाब देणार ३ साठी.
श्री डी. ए. नलावडे सोबत रवींद्र लोखंडे, जाब देणार ४ साठी.
श्री ए. बी. वग्यानी, सरकारी अभिवक्ता, जाब देणार ५ साठी.
कु श्यामली गद्रे .... मे लिटल अँड कं., यांच्या सूचनेवरून, जाब देणार ६ साठी.
श्री के. जी. देसाई ... कार्तिकेय अँड असोसिएट, यांच्या सूचनेवरून जाब देणार ७ साठी
श्री संजय जैन, सोबत कृष्णा राजा ...एल. जे. लॉ, यांच्या सूचनेवरून जाब देणार ८ साठी

गणपूर्ती: न्या. ए.एस. ओक आणि न्या.ए.एस. गडकरी
आदेश राखून ठेवला: दि २१ नोव्हेंबर, १९१४
आदेश घोषित केला: दि १९ डिसेंबर, १९१४

आदेश ( प्रतिन्या. ए. एस. ओक )

१ या न्यायालयाने विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने दाखल केलेले चार पूर्तता अहवाल तसेच राष्ट्रीय अभियांत्रिकी संशोधन संस्थेने (निरी) दाखल केलेल्या अंतिम अहावालाच्या संदर्भाने पुढील अंतरिम सहाय्याच्या मान्यते बाबत आम्ही पक्षकारांच्या विधीज्ञांचे म्हणणे ऐकलेले आहे. गंगापूर व पिंपळगाव-खांब येथील मैला बहिस्त्राव उपकरणे यासाठी भूमी संपादनाच्या प्रगती बाबतच्या मुद्द्याविषयी मत मागवले होते. जुलै २०१५ ते

ऑगस्ट २०१६ या दरम्यान आयोजित  सिंहस्थ कुंभमेळ्याच्या कृती आराखड्या बाबतही पक्षकारांचे ऐकून घेतले. कुंभ मेळ्यासाठी निधीचे वाटप  व कुंभमेळ्यासाठी केंद्र सरकार कडून निधी वितरण करणे हाही मुद्दा आहे. या न्यायालयाच्या अंतरिम निर्देशाच्या अंमलबजावणी विषयी काही प्रतिपादने केली होती. या न्यायालयाने दि. ७ मार्च २०१४ रोजी पारित केलेल्या सविस्तर अंतरिम आदेशासकट पूर्वीच्या विविध आदेशा संदर्भाने केलेल्या प्रतीपाद्नांची प्रशंसा केली पाहिजे.

२ या न्यायालयाने दिलेल्या अंतरिम निर्देशांच्या अंमलबजावणीच्या अखंड देखरेखेसाठी दि. ७ मार्च २०१४ च्या आदेशाच्या कलम १८ अंतर्गत या न्यायालयाने विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. या न्यायालयाने जारी केलेल्या निर्देशांच्या अंमलबजावणी संबंधी तसेच निरीच्या शिफारशींच्या अंमलबजावणी बाबत नियतकालिक अहवाल दर दोन महिन्यांनी या न्यायालयाने नेमलेल्या या समितीने दाखल करणे आवश्यक होते. विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या अध्यक्षतेखालील समितीने एकंदर चार अहवाल दाखल केले आहेत. या चार विस्तृत अहवालात नाशिक महानगरपालिकेसकट विविध शासकीय अधिकाऱ्यानी केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर उल्लेख  केला आहे. विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षेतेखालील समितीच्या प्रशंसनीय कार्याची आम्ही नोंद घेतली पाहिजे. या न्यायालयाने निर्गमित केलेल्या निर्देशांची अंमलबजावणी तसेच निरीच्या शिफारशींच्या अंमलबजावणीवर ही समिती कार्यक्षमतेने देखरेख ठेवत आहे, हे आम्हास आढळून आले आहे. आम्हास आशा आहे आणि विश्वास वाटतो कि हि समिती भविष्यातही असेच चांगले काम करणे चालू ठेवेल. समिती कार्यक्षमतेने काम करत असल्याने, गोदावरी नदीच्या संबंधी कायद्याचे उल्लंघन तसेच या न्यायालयाच्या आदेशांची पायमल्ली समितीच्या निदर्शनास आणून देण्यासाठी तक्रार निवारण यंत्रणा समिती स्थापन करणे आवश्यक आहे. याची संपूर्ण प्रक्रियेवर कार्यक्षमतेने निरीक्षण करण्यासाठी समितीला मदत होईल. गोदावरी नदीच्या पुनर्जोमाकरिता या न्यायालयाने स्विकार केलेली योजना नागरिकांना समजण्यासाठी आम्ही नाशिक महानगरपालिकेस सुचवू इच्छितो कि निरीचे सर्व अहवाल व या न्यायालयाच्या संबंधीत आदेशाच्या सर्व प्रती मराठी अनुवादासहित तिच्या वेबसाईट वर टाकाव्यात.

३ गोदावरी नदीच्या पुनर्जोमाकरिता मैला अभिक्रिया उपकरणे (एसटीपी) बसवणे हे एक महत्वाचे पाउल आहे. दोन एसटीपी नाशिक महानगरपालिकेने कबूल केल्या असून त्या स्थापण्याचे प्रस्तावित आहे. पहिले एसटीपी गंगापूर येथे तर दुसरे पिंपळगाव खांब येथे आहे. गंगापूर एसटीपीच्या संदर्भात  उपजिल्हाधिकारी श्री अभिराम शिंदे ( भूमी संपादन ) क्र. २ यांच्या प्रतिज्ञापत्रात म्हणले आहे कि दि. २८ ऑक्टोबर २०१४ रोजी भूमी संपादन कायदा, १८९४ च्या क. ६ नुसार परिपत्रक जरी केले आहे. प्रतिज्ञापत्रात असेही म्हणले आहे कि नाशिक महानगरपालिकेने नुकसान भरपाई रक्कम भरल्यानंतर, ३१ डिसेंबर २०१४ रोजी किंवा त्यापूर्वी निर्णय जाहीर केला जाईल. पिंपळगाव येथील एसटीपीसाठी भूमी संपादनासंबंधी

प्रतिज्ञापत्र नमूद करते कि दि. १७ सप्टेंबर २०१४ रोजी भूमी संपादन कायदा, १८९४ च्या क. ६ नुसार घोषणाही प्रकाशित झाली आहे. प्रतिज्ञा पत्रात असे म्हणले आहे कि भूमी संपादन कायदा, १८९४ च्या क. ११ अंतर्गत अंतिम निर्णय होऊन १५ जानेवारी २०१५ रोजी किंवा त्यापूर्वी घोषित केला जाईल. आम्हास हे नोंदवले पाहिजे कि दोन्ही भूमीसंपादनाच्या वेळेची बाह्य-मर्यादा, प्रतिज्ञा पत्रात सांगितल्याप्रमाणे, नाशिक महानगरपालिकेने नुकसान भरपाई रक्कम भरण्यावर अवलंबून आहे. नाशिक महानगरपालिकेचे विधीज्ञ प्रतिपादन करतात कि उपजिल्हाधिकारी भूमी संपादन क्र. २ यांनी मागीतल्या प्रमाणे योग्य त्या रकमेचा भरणा झाला आहे. ते सांगतात कि नाशिक महानगरपालिकेतर्फे रक्कम भरण्याविषयीचा मुद्दा राहिला नसून आवश्यक ते सर्व केले जाईल.

४ उपजिल्हाधिकारी श्री अभिराम शिंदे ( भूमी संपादन ) क्र २, यांच्या प्रतिज्ञापत्रातील विधाने आम्ही स्विकारतो.

५ नाशिक महानगरपालिकेकडून एसटीपींचे बांधकाम ताबडतोब सुरु करता यावे म्हणून राज्य शासनास दोन्ही संपादित जमिनीचा ताबा शक्यतो त्वरित नाशिक महानगरपालिकेस द्यावा लागेल. एसटीपींचे बांधकाम पूर्ण होऊन त्या कार्यरत होतील यासाठी लागणाऱ्या कालावधीची बाह्य-मर्यादा निश्चित करणारे प्रतिज्ञापत्र नाशिक महानगरपालिका १५ फेब्रुवारी २०१५ च्या अखेरीस दाखल करेल. विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या अध्यक्षेतेखालील समिति एसटीपींच्या बांधकामाच्या प्रगतीवर देखरेख करेल.

६ जुलै २०१५ पासून नाशिक व त्रिंबकेश्वर येथे कुंभमेळ्याचे आयोजन केल्या जाईल. प्रथेप्रमाणे दर बारा वर्षांनी कुंभमेळा आयोजित होतो. राज्य सरकारच्या अंदाजा नुसार जवळपास ३ लाख साधू व १ कोटी भक्त १३ सप्टेंबर २०१५, या महत्वाच्या दिवशी निर्धारित, दुसऱ्या शाही स्नानाच्या तिथीस, गोदावरी नदीत पवित्र स्नान करतील. पहिले शाही स्नान २९ ऑगस्ट २०१५ या दिवशी निश्चित आहे. या महत्वाच्या दिवसा शिवाय वर्षभराच्या कुंभमेळ्यात इतर ३७ पवित्र दिवस घोषित केले आहेत, ज्या दिवशी लाखो यात्रेकरू गोदावरी नदीत पवित्र स्नान करण्याची अपेक्षा आहे. दि. २८ डिसेंबर २०१२ च्या शासकीय ठरावा नुसार सिंहस्थ कुंभमेळ्याच्या आयोजन व व्यवस्थापनेसाठी मा. मुख्यमंत्र्यांच्या अधिपत्याखाली शिखर समिती, उच्च्याधिकार समिती आणि जिल्हास्तरीय समितीचे गठन केले आहे. आम्हास येथे नोंदवले पाहिजे कि येऊ घातलेल्या कुंभमेळ्याचा सामना करण्यासाठी नोव्हेंबर २०१३ मध्ये विविध शिफारशीचा अंतर्भाव असलेला कृती आराखडा निरीने सादर केला आहे. निरीच्या शिफारशी (तिसरा पूर्तता अहवालाच्या क्रमांक ६ मध्ये चर्चा केलेली शिफारस सोडून) अमलात आणाव्यात असा निर्देश करणारा आदेश यापूर्वीच या न्यायालयाने दिलेला आहे. जर कृती आराखड्यातील निरीच्या शिफारशी सिंहस्थ कुंभमेळ्या दरम्यान योग्यरित्या अमलात आणल्या नाहीत तर गोदावरी नदी आणखीन प्रदूषित होईल ज्यायोगे या न्यायालयाचे सर्व आदेश पराभूत होतील. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या आयोजना साठी नियोजन करताना सर्व संबंधीत

अधिकाऱ्यांना या जनहितयाचिके मध्ये दिलेल्या विविध आदेशांतर्गत निर्देशांचे पालन करावे लागेल. आम्ही राज्य शासनास निर्देश देतो कि खालील बाबी दि. २८ डिसेंबर २०१२ च्या शासकीय ठरावा नुसार गठीत शिखर समिती, उच्च्याधिकार समिती आणि जिल्हास्तरीय समितीच्या निदर्शनास आणून द्याव्यात.

अ] ७ मार्च २०१४ रोजी या न्यायालयाने दिलेला सर्वसमावेशक अंतरिम आदेश आणि इतर संबंधीत आदेश;

ब] या न्यायालयाने दिलेल्या आदेशांच्या अमलबजावणीवर देखरेख करण्यासाठी विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली समितीचे गठन;

क] होऊ घातलेल्या कुंभममेळ्याचा सामना करण्यासाठी निरी अहवालाच्या, त्यातील कृती योजनेसकट, शिफारशी.

७ दि. २८ डिसेंबर २०१२ च्या शासकीय ठराव क्रमांक नुसार प्रस्थापित समित्या वरील तीन बाबींचा विचार करतील आणि या न्यायालयाचे आदेश पराभूत होणार नाहीत याची खात्री करतील. सिंहस्थ कुंभमेळ्या दरम्यानचे प्रदूषणास प्रतिबंध आणि ते कमी करण्यासाठी निरीच्या शिफारशीची अंमलबजावणी होईल याची खात्री करतील.

८ सर्व अधिकाऱ्यांना सिंहस्थ कुंभमेळ्याची अंमलबजावणी करता येण्यासाठी दुसरी समस्या आवश्यक निधीच्या उपलब्धतेची आहे. जिल्हाधिकारी श्री विलास बलराम पाटील यांनी दि. ४ जुलै २०१४ रोजी केलेले प्रतिज्ञापत्र आहे. हे प्रतिज्ञापत्र सांगते कि सिंहस्थ कुंभमेळा २०१५-२०१६ करिता एकूण २३७८.७८ कोटी रुपयांचा निधी आवश्यक आहे. या निधी पैकी १०५२.६१ कोटी रुपयापर्यंतची कमाल गरज नाशिक महानगरपालिकेची आहे. नाशिक महानगरपालिकेने जवळपास ६६९.६१ कोटी रक्कमेच्या कामाचे आदेश यापूर्वीच दिले आहेत. समस्या निधीच्या उपलब्धतेची आहे.

९ केंद्र शासनाने कुंभमेळ्यासाठी निधी वाटप करावा अशी विनंती करणारा सविस्तर पत्रव्यवहार राज्य शासनाने केंद्र शासनाशी केलेला आहे. मुख्य योजना २३७८.७८ कोटी रुपयाची होती म्हणून केंद्रीय सहाय्याची विनंती करणारे राज्याच्या त्या वेळच्या मा. मुख्यमंत्र्यांनी नियोजन आयोगाच्या उपाध्यक्षाना संबोधलेले दि. १५ मे २०१४ चे पत्र आहे. राज्य शासनाने संबोधलेल्या या सर्व पत्रामध्ये दाखवून दिले आहे कि २०१२-२०१३ या वर्षातील अलाहाबाद येथे भरलेल्या कुंभ मेळ्यासाठी ११०० कोटी रुपयापर्यंतचे अर्थसहाय्य केंद्र शासनाने उत्तरप्रदेश शासनास पुरवले होते. २००३-२०-०४ या वर्षाच्या नाशिक येथील कुंभमेळ्यासाठी केंद्र शासनाने सहाय्य दिले होते. कुंभमेळ्यातील घटनांच्या सुरक्षित,यशस्वी आणि शांततापूर्ण आयोजनासाठी वेळेत कार्ये पूर्ण करण्याची खात्री करण्यास्तव 'बंधमुक्त एकवेळ केंद्रीय सहाय्य' पुरवण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनास वारंवार विनंती केलेली आहे. राज्य शासनाच्या विनंतीवरूनहि 'बंधमुक्त एकवेळ केंद्रीय सहाय्य' देण्याविषयी केंद्र शासनाने निर्णय घेतला नाही हि तक्रार केल्याने, भारताच्या अतिरिक्त सॉलिसीटर-जनरलना सूचना घेता याव्यात म्हणून, आम्ही हि

याचिका वेळोवेळी तहकूब केली होती. विद्वान एएसजीनी त्यांना नियोजन आयोगाच्या संचालकांनी ( पिसिएमपी च्या) संबोधित केलेले दि. १९ नोव्हेंबर २०१४ चे एक पत्र दाखवले आहे. हे पत्र नोंदवते कि जरी कुंभमेळ्याचे  आयोजन हा राज्यसुचीतला विषय असला तरी, घटनेचे महत्व लक्षात घेता, केंद्र शासनाने या प्रकरणात लक्ष घातले आहे आणि राज्य शासनाच्या  प्रस्तावाचा ते सक्रियतेने विचार करत आहे. पत्र नोंदवते कि विषयाच्या निकडीची नोंद घेतली आहे कारण पुढल्या वर्षाच्या मध्यापर्यंत हि घटना आयोजित केली आहे. हे प्रतिपादन केले आहे कि केंद्र शासन राज्य शासनास काहीतरी सहाय्य करण्यासाठी वचनबद्ध आहे  आणि या संदर्भातील निर्णयास लवकरच अंतिम स्वरूप दिले जाईल.

१० राज्य शासनाने केलेल्या विनंतीवरून एकवेळ सहाय्य, लवकरात लवकर, प्राधान्याने जानेवारी २०१५ च्या अखेर पर्यंत, प्रदान करण्यासाठी केंद्र शासनास योग्य तो निर्णय घ्यावा लागेल. निरीच्या कृती योजनेच्या अंमलबजावणी करता पुरेशा निधीची उपलब्धता  आवश्यक आहे. आम्हास सांगण्यात आले आहे कि नेहमीच्या प्रथेप्रमाणे राज्य शासन रक्कम खर्च करते आणि एकवेळ सहाय्य परतफेड म्हणून प्राप्त होते. म्हणून, केंद्र शासनासमोर प्रस्ताव प्रलंबित असला तरी राज्य शासनाने पर्याप्त निधीच्या उपलब्धतेची खात्री केली पाहिजे.

११ कुंभमेळ्या संदर्भाने आम्हास ज्ञात आहे कि विशिष्ट वेळी नाशिक व त्रिंबकेश्वरला एक कोटी पेक्षा जास्त यात्रेकारु भेट देतील. अशी पूर्णतया शक्यता आहे कि असा मोठा समुदाय गोदावरी नदीचे प्रदूषण नियंत्रित आणि प्रतिबंध करण्याच्या प्रयत्नावर प्रतिकूल परिणाम करेल. कचरा गोळा करण्यासाठी गोदावरी नदीच्या आसपास विविध ठिकाणी मोठी पात्रे पुरवण्यासाठी व्यवस्था केल्या जातील याची खात्री कुंभमेळ्याशी निगडीत सर्व अधिकारी आणि नाशिक महानगरपालिकेस करावी लागेल. ठराविक अंतरावर ठेवलेल्या पात्रामधून कचरा उचलण्यासाठी व्यवस्था कराव्या लागतील. तसेच निर्माल्या सारखे सेंद्रिय पदार्थ गोळा करण्यासाठी मोठ्या संख्येने अतिरिक्त कलश उपलब्ध करून द्यावे लागतील. गोदावरी नदी स्वच्छ ठेवण्यासाठी सर्व पाऊले उचलण्याकरिता  यात्रेकारु आणि अभ्यागतांना विनंती करणारे बॅनर्स, फ्लेक्सेस,फलके शहराच्या विविध भागात आणि शहरातील विविध प्रवेशाच्या ठिकाणी नाशिक महानगरपालिकेस उभी करावी लागतील. गोदावरी नदीमध्ये कचरा व सेंद्रिय पदार्थ फेकू नयेत असे आवाहन फलकामधे असेल. या न्यायालयाच्या हुकुमान्वये गोदावरी नदीचे प्रदूषण कमी करण्याचे आणि तिला नवचैतन्य देण्यासाठी प्रयत्न होत आहेत अशीही नोंद फलकात असेल. गोदावरी नदी प्रदूषण मुक्त ठेवण्यासाठी सर्व संबंधितानी सहकार्य करावे असे आवाहन करावे लागेल. असे फलक मराठी आणि हिंदी भाषेमध्ये असतील.

१२ निरीच्या शिफारशीसंदर्भात  आम्हास असा दृष्टिकोन ठेवला पाहिजे कि सर्व संबंधितानी निरीच्या शिफारशीची अंमलबजावणी केली पाहिजे. तथापि निरीच्या शिफारशीसंदर्भात एक समस्या उपस्थित होते.  या न्यायालयाने नियुक्त केलेल्या समितीच्या तिसऱ्या पूर्तता अहवालाचे  कलम ६ निरीच्या एका विशिष्ट शिफारशीवर केलेल्या एका  महत्वाची कृतीची

नोंद करते. मुद्दा ओढा बंधाऱ्या पर्यंतच्या नदीच्या प्रवाहातील प्रदूषण सामुग्रीस प्रतिबंध करण्यासाठी एक महत्वाचे पाऊल उचलण्याचा आहे. सुचवलेली कारवाई अशी आहे कि नाशिक शहरातील संबंधित एसटीपीच्या बाह्यामार्गापासून उपचार केलेले सांडपाणी सरळ उचलण्याकरिता जाब देणार क्रमांक ७ आणि ८ यांच्यावर अट पुन्हा लादण्यासाठी या न्यायालयाने राज्याच्या जलस्त्रोत खात्यास एक निर्देश दिला पाहिजे. वस्तुतः संबंधीत खात्याच्या अधीक्षक अभियंत्यांनी मुख्य अभियंत्यांना अशीच सूचना दि. ९ ऑक्टोबर २०१४ च्या पत्रामध्ये केली आहे. एसटीपीच्या बाह्यमार्गापासून सांडपाणी सरळ उचलण्यासाठी जाब देणार क्रमांक ७ यास सूचना देऊन गोदावरी नदीमध्ये उपचार केलेले सांडपाणी सोडू नये असे निर्देश नाशिक महानगरपालिकेस दयावेत अशी हि सूचना आहे. गोदावरी नदीचे प्रदूषण टाळण्यासाठी हे पाउल उचलणे गरजेचे आहे. या बाबीवर जाब देणार क्रमांक ७ आणी ८ यांची सुनावणी झाली पाहिजे.

१३ याचिकाकर्त्याच्या विधीज्ञांनी नजरेस आणून दिले आहे कि या न्यायालयाच्या निर्देश असून देखील दसऱ्या प्रसंगी अनेक वाहन मालकांनी व चालकांनी नदीच्या जवळ मोठ्या संखेने वाहने आणली आणि ते धुण्यासाठी नदीचे पाणी वापरले. त्यांनी गोदावरी नदीच्या किनारी पडलेले सेंद्रिय पदार्थ आणि निर्माल्य दाखवण्यासाठी छायाचित्रांवर विश्वास ठेवला आहे. त्यांनी नजरेस आणून दिले आहे कि काही भागात अडथळे उभारले गेले नाहीत आणि यामुळेच नदीच्या जवळ वाहने जाऊ शकतात.

१४ याचिकाकर्त्याच्या विधीज्ञांनी जल (प्रतिबंध आणि नियंत्रण) प्रदूषण कायदा १९७४ चे कलम २४ व ४३ नजरेस आणून दिले आणि याचना केली कि प्रदूषण नियंत्रण मंडळास सक्रिय भूमिका बजवावी लागेल कारण या कायद्या अंतर्गत गुन्ह्याची दखल महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकृत अधिकाऱ्यानी तक्रार केल्यानंतरच घेतली जाते. त्यांनी याचना केली कि कडक कारवाई करण्यासाठी प्रदूषण नियंत्रण मंडळास निर्देश देणे आवश्यक आहे. त्यांनी प्रतिपादन केले कि भारतीय दंड संहिता आणि बॉम्बे पोलीस कायदा १९५१ च्या दंडनीय तरतुदी पुरेश्या निवारक नाहीत. त्यांनी प्रतिपादन केले कि महाराष्ट्र मालमत्ता विद्रुपता प्रतिबंध कायदया मधील दंडनीय तरतुदी देखील प्रतिबंधक नाहीत. त्यांनी प्रतिपादन केले कि राज्य शासनास या कायद्यांचे पुनरावलोकन करून कडक शिक्षा/दंडाची तरतूद केली पाहिजे.

१५ याकारणास्तव आम्ही खालील अंतरिम निर्देश जारी करत आहोत :

१ हे पुढील अंतरिम निर्देश या न्यायालयाचे ७ मार्च २०१४ रोजी दिलेले पूर्वीचे निर्देश आणि आजतागायत अमलात असलेले सर्व आदेश यांचा विस्तार असेल;

२ आम्ही जाब देणार क्रमांक ७ आणी ८ यांना निर्देश देतो कि नाशिक शहरातील उपचार केलेले सांडपाणी एसटीपीच्या बाह्यमार्गापासून सरळ उचलण्याच्या मुद्द्या बाबत जाब देणार क्रमांक ७ आणी ८ यांनी प्रतिज्ञापत्र दाखल करावे. गोदावरी नदीचे प्रदूषणास

प्रतिबंध करण्यासाठी विविध सूचनांचा अंतर्भाव करण्यासाठी हे जाब देणार स्वतंत्र आहेत. राज्य शासन देखील या बद्दल प्रतिज्ञापत्र दाखल करेल. प्रतिज्ञापत्रे ९ जानेवारी २०१५ रोजी किंवा त्यापूर्वी दाखल करावेत. याचिका १७ जानेवारी २०१५ रोजीच्या यादी मध्ये 'प्रतिज्ञापत्रांचा विचार करण्यासाठी निर्देश' या शिर्षकाखाली घ्यावी.

३ आम्ही राज्य शासनास निर्देश देतो कि दि. २८ डिसेंबर २०१२ च्या शासकीय ठरावा नुसार गठीत शिखर समिती, उच्च्याधिकार समिती आणि जिल्हास्तरीय समितीच्या निदर्शनास खालील बाबी आणून द्याव्यात:

अ] या न्यायालयाचे ७ मार्च २०१४ रोजी दिलेले व्यापक अंतरिम निर्देश आणि ह्या आदेश सकट सर्व संबंधित आदेश;

ब] ह्या न्यायालयाच्या आदेशांच्या अंमलबजावणीच्या देखरेखेसाठी नियुक्त विभागीय आयुक्त नाशिक यांच्या अधिपत्याखालील समितीचे अस्तित्व;

क] सर्व अहवालातील निरीच्या शिफारशी, येऊ घातलेला कुंभमेळयाचा सामना करण्याकरिता दिलेली कृती योजना.

४ दि. २८ डिसेंबर २०१२ च्या शासकीय ठरावा नुसार गठीत समित्या वरील तीन बाबीचा विचार करतील आणि या न्यायालयाचे आदेश पराभूत होणार नाहीत हे सुनिश्चित करतील;

५ आम्ही निर्देश देतो कि, पुढच्या तारखेला विचारात घेतला जाणारा मुद्दा सोडून, सर्व अहवालातील निरीच्या शिफारशी, अंतिम अहवाल तसेच येऊ घातलेला कुंभमेळयाचा सामना करण्याकरिता दिलेली कृती योजना यांची अंमलबजावणी सर्व संबंधित करतील;

६ आम्ही केंद्र शासनास निर्देश देतो कि, राज्य शासनाने नाशिक आणि त्रिंबकेश्वर येथे २०१५-२०१६ दरम्यान आयोजित सिंहस्थ कुंभमेळयासाठी एकवेळ आर्थिक सहाय्य देण्याविषयी दाखल केलेल्या प्रस्तावावर, लवकरात लवकर, प्राधान्याने २८ फेब्रुवारी २०१५ रोजी किंवा त्या आधी, योग्य तो निर्णय घ्यावा;

७ गंगापूर आणि पिंपळगाव खांब येथे बसवल्या जाणारया एसटीपी करिता आवश्यक भूमीचे संपादन पूर्ण होण्यासाठी लागणाऱ्या मुदतीची बाह्य-मर्यादा या संबंधी, उपजिल्हाधिकारी श्री अभिराम शिंदे (भूमी संपादन) क्र.२, नाशिक यांची दि ७ नोव्हेंबर २०१४ च्या प्रतिज्ञा पत्रातील विधाने आम्ही स्वीकारतो. दोन्ही एसटीपी करिता आवश्यक असलेल्या दोन्ही जमिनीचा ताबा राज्यशासन शक्यतो त्वरित आणि कुठल्याही परिस्थितीत १५ फेब्रुवारी २०१५ रोजी किंवा त्या आधी नाशिक महानगरपालिकेस देण्याकरिता प्रयत्नशील राहील. एसटीपींचे बांधकाम पूर्ण होऊन त्या कार्यरत होतील यासाठी लागणाऱ्या कालावधीची बाह्य-मुदत निश्चित करणारे प्रतिज्ञापत्र नाशिक महानगरपालिका १५ फेब्रुवारी २०१५ च्या अखेरीस दाखल करेल. गंगापूर आणि पिंपळगाव खांब येथील एसटीपींच्या बांधकामाच्या प्रगतीवर तसेच त्यांचे कार्य सुरु होण्यावर या न्यायालयाने नियुक्त केलेली समिती देखरेख करेल.

८ विविध प्रकारच्या उल्लंघनासाठी कडक शिक्षा/दंडाच्या तरतुदी करिता राज्य शासन बॉम्बे पोलीस कायदा आणि विद्रुपता प्रतिबंध कायदा यांच्या दुरुस्तींचा विचार करेल;

९ या न्यायालयाने नियुक्त केलेली समिती गोदावरी नदीच्या जवळ वाहनांचा प्रवेश प्रतिबंधित करण्याकरिता अडथळे उभारण्याचा विचार करेल आणि नाशिक महानगरपालिकेस योग्य ते निर्देश देईल;

१० कुंभमेळ्या दरम्यान कचरा गोळा करण्यासाठी गोदावरी नदीच्या आसपास विविध ठिकाणी मोठी पात्रे पुरवण्यासाठी व्यवस्था केल्या जातील याची खात्री नाशिक महानगरपालिका करेल. ठराविक अंतरावर ठेवलेल्या पात्रामधून कचरा उचलण्यासाठी व्यवस्था करावी. तसेच निर्माल्या सारखे सेंद्रिय पदार्थ गोळा करण्यासाठी मोठ्या संख्यने अतिरिक्त कलश उपलब्ध करावेत.

११ कुंभमेळ्या दरम्यान नाशिक महानगरपालिका, गोदावरी नदी स्वच्छ आणि प्रदूषण मुक्त ठेवून तिचे पावित्र्य टिकवण्यासाठी सर्व पाऊले उचलण्याचे त्यांचे कर्तव्य आहे हे यात्रेकारु आणि अभ्यागतांना सांगणारे बॅनर्स, फ्लेक्सेस ,फलके शहराच्या विविध भागात आणि शहरातील विविध प्रवेशाच्या ठिकाणी उभी करेल. नदीमध्ये कचरा व सेंद्रिय पदार्थ फेकू नयेत असे आवाहन फलकामधे असेल. या न्यायालयाच्या हुकुमान्वये गोदावरी नदीचे प्रदूषण कमी करण्याचे आणि तिला पुनर्जोम प्राप्त करून देण्याचे प्रयत्न होत आहेत अशीही नोंद फलकात असेल. जे कायद्याचे उल्लंघन करतील त्यांच्या विरुद्ध कडक कारवाई केली जाईल याचा आवाहनात अंतर्भाव असेल. असे फलक मराठी आणि हिंदी भाषेमध्ये असतील.

१२ आम्ही जाब देणार तीन यांना निर्देश देतो कि जल (प्रतिबंध आणी नियंत्रण) प्रदूषण कायदा १९७४ च्या कलम ४९ अन्वये गोदावरी नदीसंदर्भातील या कायद्याच्या तरतुदींच्या उल्लंघनाच्या तक्रारी दाखल करण्यास्तव त्वरित पाऊले उचलावीत.

१३ या न्यायालयाच्या आदेशान्वये गठीत केलेल्या समितीने गोदावरी नदीच्या संबंधी कायद्याचे उल्लंघन तसेच या न्यायालयाच्या आदेशांची पायमल्ली नागरिकांनी समितीच्या निदर्शनास आणून देण्यासाठी तक्रार निवारण यंत्रणा स्थापन करावी. तथापि समिती समोर सुनावणीचा हक्क कोणत्याही नागरिकास नसेल आणि समितीने प्रत्येक तक्रारी संबंधी तर्काधिष्टीत आदेश द्यावा अशी अपेक्षा नाही. समिती एक महिन्याच्या आत योग्य ती पाऊले उचलेल. तक्रार निवारण यंत्रणेचा तपशील नाशिक महानगरपालिकेच्या वेबसाईटवर उपलब्ध करून दिला जाईल.

१४ आम्ही नाशिक महानगरपालिकेस निर्देश देतो कि निरीचे सर्व अहवाल व या न्यायालयाच्या संबंधीत आदेशाच्या सर्व प्रती मराठी अनुवादासाहित तिच्या वेबसाईट वर टाकाव्यात.

( न्या. ए. एस. गडकरी)　　　　( न्या. ए. एस. ओक )

स्न्क१६-३